**नगरसचिव**

**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.६**

ऑगस्ट २०२०

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि.१८/८/२०२० रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) दृक श्राव्य ( व्हिडीओ कॉन्फरन्सींग ) द्वारे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.८०**

संदर्भ – १) मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष,शहर सुधारणा समिती यांचे दि.२६/६/२०२० चे पत्र
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २८ दि.२६/६/२०२०
३) मा.बाळा ओसवाल, मा.महेंद्र पठारे व मा.सौ.सुनिता गलांडे यांची दि.२१/७/२०२० ची उपसूचना.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.३३०,दि.२१/७/२०२०

----

शहर सुधारणा समितीने केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.९ बाणेर–बालेवाडी–पाषाण येथील मौजे बाणेर स.नं.८२ येथील ओटा मार्केटचे काम पूर्ण होऊन ५ वर्षे झाली आहेत. तरी सदर वास्तू विनावापर अभावी खराब होत आहे व त्यातून पुणे महानगरपालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान देखील होत आहे.

सदर ओटा मार्केट मधील गाळे लवकरात लवकर महानगरपालिकेने विशिष्ठ धोरण ठरवून भाडे तत्वावर देण्यात यावे जेणेकरून पुणे म.न.पा.स उत्पन्न सुरु होईल तसेच ज्यांना भाजीपाला ,फळे विक्रीसाठी या गाळ्यांची गरज आहेत अशा विक्रेत्यांना त्याचा लाभ होईल. तसेच यामध्ये पथारीवाले सोडून जे विना परवाना धारक विक्रेते जरी इच्छुक असतील तर त्यांचा देखील विचार व्हावा व त्यांना देखील पुणे म.न.पा.ने धोरण ठरवून यामध्ये प्राधान्य द्यावे.

तसेच यामध्ये ५०% गाळे हे परवाना धारक विक्रेत्यांना व ५०% गाळे हे विनापरवाना धारक विक्रेत्यांना भाडे तत्वावर पुणे म.न.पा.ने धोरण ठरवून द्यावे.

तरी सदर ओटा मार्केट लवकरात लवकर करून वरील कारवाई करण्यास तसेच यामध्ये परवानाधारकांना प्रथमत: प्राधान्य देऊन उर्वरित सर्व गाळे लिलाव करुन विना परवाना धारकांना भाडेतत्वावर देणेस त्याप्रमाणे खराडी–वडगांवशेरी येथील बंद असलेली मार्केट यापध्दतीने सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.८१**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१८१ दि.२१/७/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३४०,दि.२१/७/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेतील शासन आदेशानुसार राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना तुर्तास करोना पार्श्वभुमीवर ६ महिन्यांकरिता किमान वेतन अदा करणेसाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या तकत्त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करुन देणेस (सद्यस्थितीत भत्ते, चलनवाढ इत्यादींचा विचारान्वये) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाच्या इंटीग्रेटेड हेल्थ अॅड फॅमिली वेल्फेअर सोसायटी फॉर पीएमसी च्या बँक खात्यावर जमा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.८२**

संदर्भ - १) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८३ दि. २८/४/२०२०

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१३१ दि.१६/६/२०२० चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.३४७,दि.२८/७/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

कोविड-१९ ची रोगराईमुळे तसेच अन्य कारणामुळे दि. ३१/०३/२०२० अखेर पर्यन्त झालेल्या कामांची/आदा न केलेल्या बिलांकरिता मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दि. २८/०४/२०२० अन्वये दि.३०/०५/२०२० अखेर पर्यन्त दिलेल्या मुदतवाढी मध्ये प्राप्त झालेली सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पातील ज्या भांडवली व विकास कामांची देयके प्राप्त झाली आहे अशी बिले अदा करण्यासाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामधून तरतूद उपलब्ध करुन देणेस व अशा कामांची देयके अदा करण्यासाठी खालीलप्रमाणे कपात करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मुख्य खाते- | सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.३७५.६० कोटी | सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या संबंधीत मुख्य खात्याच्या भांडवली तरतूदीमधून करण्यास |
| २) | ‘ स ‘ यादी- | सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.२९७.१३ कोटी | ब) ज्या मा. सभासदाच्या कामांची देयके आदा करावयाची आहेत . त्याच मा. सभासदांच्या सन २०२०-२१च्या अंदाजपत्रकातील भांडवली ‘‘स’’ यादी मधुन करण्यास. |

**विषय क्र.८३**

संदर्भ - १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.

२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)

५) मा.महा.आयुक्त यांचे आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/४९९ दि.३/५/२०२०

६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/१८४ दि.२२/७/२०२० चे पत्र.

७) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५४,दि.२८/७/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिका झोन क्र.४ वानवडी रामटेकडी कार्यालयाचे कार्यक्षेत्रा अंतर्गत कोव्हीड-१९ प्रतिबंधित क्षेत्रामध्ये (containment zone)मध्ये रस्ता पत्रे व बांबू च्या सहाय्याने बंदीस्त करणे कामी मे.निलेश तरवडे, झारा एंटरप्रायजेस, विजय भोसले, कबीर पटेल, सतीश मोगरे या एजन्सी कडून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्यात येत असून मा.मुख्य सभेस अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

वानवडी रामटेकडी कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. २४, २५ व २७ ‘कोविड-१९’ विषाणूने प्रतीबंधित क्षेत्रातील गल्लीबोळ, रस्ते हे पत्रे व बांबूच्या सहाय्याने मे.निलेश तरवडे, झारा एंटरप्रायजेस, विजय भोसले, कबीर पटेल, सतीश मोगरे या एजन्सी कडून र.रुपये ९,९०,०५५/- व सह जी.एस.टी. (१२%) प्रमाणे र.रुपये १,१८,८०६=६० असे एकूण र.रुपये ११,०८,८६१=६० देणेस व बिल खालील अर्थशिर्षकामधून अदा करणेस

‘सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी - RE17F 257

Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

१) मे.निलेश तरवडे, झारा एंटरप्रायजेस, विजय भोसले, कबीर पटेल, सतीश मोगरे यांचेशी करार करणेस,
२) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामधील तक्त्यातील अ.क्र. १ ते ४ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार सदरचे काम संपेपर्यंत करणेस,

**विषय क्र.८४**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मा.तंत्र./१८५ दि.२३/७/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५५,दि.२८/७/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

Critical Patient Management System उपलब्ध करून घेणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७,(३)(क) नुसार खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) Indohealth Software Solutions Pvt.Ltd यांच्याकडून गंभीर कोरोना रूग्णांची सेवा आणि डिजीटल माहिती पुरविण्याचे १ वर्षासाठी कामकाज करून घेणेस.
२)Indohealth Software Solutions Pvt.Ltd यांना one time setup संगणक प्रणालीची रक्कम रू.१०.०० लाख + Taxes देणेस.
३) प्रती गंभीर रूग्ण र.रू.३००/- + Taxes या प्रमाणे बिल अदा करणेस.
४) Indohealth Software Solutions Pvt.Ltd यांच्याशी करारनामा करणेस.
५) Indohealth Software Solutions Pvt.Ltd यांना बिल अदा करणेस खालील बजेट हेडवर खर्च करणेस.

RE11N103
( सन २०२०-२०२१) अर्थशिर्षकातून खर्च करणेस.
विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकमार्फत करून घेणे
ERP अंमलबजावणी , Software Development,
GIS, Work Management System, Kiosk व तद्नुषंगिक कामे करणे.

**विषय क्र.८५**

संदर्भ - १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) महा.सहा.आयुक्त कार्या.सिंहगडरोड,पुणे मनपा जा.क्र.५३३ दिं १२/५/२०२० प्रस्ताव
६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.३/१८७ दि.२४/७/२०२० चे पत्र.
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५६,दि.२८/७/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत पुणे म.न.पा.चे कै.मुरलीधर लायगुडे या हॉस्पीटल इमारत व नवले शाळा येथे पुणे मनपा तर्फे स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/CCC क्रेंद्रसाठी दररोज दाखल होणाऱ्या कोरोना बाधित नागरिकांना दैनंदिन सकाळी चहा , नाश्ता, दुपारचे जेवण,सायंकाळी चहा व बिस्किट,रात्रीचे जेवण, लहान मुलांसाठी दुध व बिस्कीटे, गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल व इतर आवश्यक बाबी तयार अन्न पुरविणे या कामाचे एजन्सी १) मे.मॉर्डन केटरर्स २) मे.श्रीमती देशमुख ३)मे.साईलिला कॅफे यांच माहे मे २०२० मधील दि.०१/०५/२०२० ते ३१/५/२०२० अखेरचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये करणेसाठी खालील बाबीस पश्चात मान्यता देण्यात येत असून मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

१) श्रीमती निर्मला देशमुख यांनी कै.लायगुडे हॉस्पीटल येथे दि.१/५/२०२० ते दि.३१/५/२०२० अखेर पुरविलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील परिशिष्ठ (अ.१) प्रमाणे सकाळचा चहा व नाष्टा, मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील परिशिष्ठ (अ-२) प्रमाणे दुपारचा चहा व परिशिष्ठ (अ-३) प्रमाणे लहान मुलांसाठीचे दुध यांचा एकूण खर्च र.रू.६३,७१५/-, १०% जी.एस.टी सह र.रू.७०,०८६.५० यांना

आदा करणेस.

२) मे.मॉर्डन केटरर्स (श्री.राम यत्नाळकर ) यांनी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील परिशिष्ट (क) प्रमाणे उपरोक्त हॉस्पीटल मध्ये दाखल पेशंटला सकाळ व संध्याकाळचे जेवण र.रू.७५/- प्लेट प्रमाणे पुरविले असून दि.१/५/२०२० ते दि.३१/५/२०२० पर्यंत त्यांचा खर्च र.रू.२,४१,२७५/- एवढा खर्च होत असून १०% जी.एस.टीसह एकूण खर्च २,६५,४०२/- यांना आदा करणेस.

३) वरील १ व २ प्रमाणे खर्च खालील अर्थशिर्षकावर करणेस.

अर्थशिर्षक - सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

Covid-19 अंतर्गत अत्यावश्यक भांडवली महसूल कामासाठी (खर्च)

**RE17F257**

४) वरील अ.क्र. (१) व (३) ची माहे मे २०२० मधील झालेल्या कामाची कार्यवाही व अमंलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम नं.६७(३)(क) अन्वये सदर ठिकाणचे काम संपेपर्यंत करून घेण्यास.

**विषय क्र.८६**

संदर्भ - १) पुणे छावणी परिषद, गोळीबार मैदान, पुणे - ०१ यांचे दि.२१/७/२०२० रोजीचे पत्र.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१९१ दि.२७/७/२०२० चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५८,दि.२८/७/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

सरदार वल्लभभाई पटेल कँटोन्टमेंट जनरल हॉस्पीटल, गोळीबार मैदान, शंकरशेठ रोड, कॅम्प, पुणे १ रुग्णालयाशी पुणे मनपाने पुणे शहरातील रुग्णांना उपचारार्थ ५० आयसोलेशन बेड ऑक्सिजनसहीत व १० आयसीयू बेड व्हेंटीलेटर सहीत, मनुष्यबळ, कंज्यूमेबल व रुग्णांचे जेवण इ. सोयी सुविधा पुरविणेसाठी करार करणेस व सदर सेवा पुरविणे कामी दरमहा र.रु.५०,००,०००/- (र.रु.पन्नास लाख रुपये फक्त) सहा महिने या कालावधीसाठी अदा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## शहर सुधारणा समितीचा ठराव

**विषय क्र.८७**

संदर्भ- १) पुणे शहरातील एच.सी.एम.टी.आर. प्रकल्पाच्या तांत्रिक आराखडा मान्यतेचा मा.मुख्य सभा ठराव क्र.३५६,दि.२५/९/२०१७

२) मुख्य अभियंता पथ विभागाकडील प्रस्ताव जा.क्र.पथ/३६९६,दि.१३/८/२०१९

३) मा.मुख्य सभा ठराव क्र.४८५,दि.९/९/२०१९

४) दैनिक वर्तमान पत्रामधील जाहिरात क्र.१/५११,दि.११/९/२०१९ व राजपत्र दि.१६/९/२०१९

५) शुध्दीपत्रक व राजपत्र दि.१/११/२०१९

६) प्राप्त हरकती सुचनाचे अनुषंगाने पथ विभागाचा अभिप्राय जा.क्र.पथ/९१५४,दि.१०/२/२०२०

७) पथ विभागाचा अभिप्राय जा.क्र.पथ/१०२४७,दि.१२/३/२०२०

८) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शहर अभि./१७४,दि.१७/७/२०२० चे पत्र.

९) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.३०,दि.२४/७/२०२०

विषय- पुणे शहरातील उच्च क्षमता द्रुतगती मार्ग प्रकल्पाच्या प्रस्तावित मार्गिकेच्या आखणीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये करावयाचे फेर बदलाचे कार्यवाही बाबत.

-----

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

विषयांकित प्रस्तावित एच.सी.एम.टी.आर.च्या मार्गिकाच्या आखणीमध्ये सुनावणी नुसार अभिप्राय/ मतानुसार काही किरकोळ खालीलप्रमाणे बदल सुचविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | बदलाचे ठिकाण | मा.मुख्य सभेच्या मान्यतेनुसार मार्गिका | प्रस्तावित नविन मार्गिका |
|---|---|---|---|
| १ | कोथरूड,कर्वेनगर गांधी लॉन्स ते अलंकार पोलिस चौकी | 'J' 'K' | J2, K2 |
| २ | वडगावशेरी | S'T' | S2 ,T2 |
| ३ | स.नं.२२७/अे/२२७/१ ते १७ लोहगाव | W' 'X' | W2,X2 |

त्यानुसार एच.सी.एम.टी.आर.ची आखणी ही नकाशात दर्शविल्याप्रमाणे कायम केलेली आहे. या व्यतिरिक्त सर्व हरकतदाराचे आक्षेप फेटाळण्यात आले आहेत. सुनावणीस हजर असलेल्या सर्व हरकत दारांची हरकत व त्यावर घेतलेला निर्णयाचा तक्ता ( परिशिष्ट-१) पाने १ ते १५१ ) मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रात सादर केलेले आहे.

तरी वरील हरकती / सुचनांचा अहवालाचे अवलोकन होऊन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये कार्यवाही पुर्ण करून कलम ३७(२) अन्वये मे.शासनाची अंतिम मान्यता मिळणेकरिता मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**महिला व बाल कल्याण समितीचा ठराव**

**विषय क्र.८८**

संदर्भ- १) मा.प्रा.ज्योत्स्ना एकबोटे,अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती व मा.सौ.शितल सावंत यांचे दि.१२/६/२०२० चे पत्र.

२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.६, दि.१२/६/२०२०

----

मा.महिला व बाल कल्याण समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

शहरातील महिलांसाठी / युवतींसाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रशिक्षणांचे / अथवा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येते ही सर्व प्रशिक्षणे / प्रशिक्षण शिबिरे महापालिकेने शासनाच्या संलग्नित संस्था अथवा शासनास प्रशिक्षण देण्याऱ्या संस्थेकडून शहरातील महिलांसाठी / युवतींसाठी तसेच मनपा शाळामधील विद्यार्थी यांना देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :- ७/८/२०२०

**सुनील पारखी**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

सूचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सॲप द्वारे कळविण्यांत येईल.